# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०— २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल :dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क. : सीसीओ/ ६४९

दिनांक : १०-४-२०१५

प्रति,
मा. प्राचार्य / मा.संचालक
पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये
व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था

**विषय : शिक्षक मान्यता शिबीर शैक्षणिक वर्ष २०१४—१५.**

महोदय / महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयांमध्ये व मान्यताप्राप्त संस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०१४—१५ मध्ये शासनाच्या आदेशानुसार व विद्यापीठ परिनियमानुसार नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांना विद्यापीठाकडून मान्यता देण्यासाठी शिबीराचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | जिल्हा | ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर व पुणे ग्रामीण | सेट गेस्ट हाऊस, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | दिनांक ०६, ०७, ०८, ०९ व १० मे, २०१५ |
| २ | नाशिक | सेट गेस्ट हाऊस, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | दिनांक ११, १२ व १३ मे, २०१५ |
| ३ | अहमदनगर | सेट गेस्ट हाऊस, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | दिनांक १४ व १५ मे, २०१५ |

वर नमूद केलेल्या कालावधीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांचे शिक्षक मान्यता प्रस्ताव शिबीराच्या ठिकाणी तपासून देण्यात येणार आहे. त्यासाठी आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०१४—१५ मध्ये शासनाच्या नियमानुसार/विद्यापीठ परिनियमानुसार नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या सर्व शिक्षकांचे प्रस्ताव वर नमूद केलेल्या तारखांप्रमाणेच शिबीराच्या ठिकाणी आवश्यक त्या कागदपत्रांसहीत घेऊन यावेत.

वरील शिक्षक मान्यता शिबीराचा कार्यक्रम लक्षात घेऊन मान्यता प्रस्ताव सादर करण्यात यावे.

**टीप :—**

ज्या महाविद्यालयांनी त्यांच्या शिक्षकांची माहिती (Teacher Profile) भरलेली आहे, अशाच महाविद्यालयांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव तपासून दिले जातील.

कळावे.

आपला,

१०/४/२०१५

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)